# सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

Phone No. –( 02472) 223388 Fax No.-(02472) 223377


जा.क्र.जिपउ/साप्रवि/ने-2/कावि/ 1021/2026 दिनांक-15/07/2026

## -: प्र सि ध्दी प त्र क :-

जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत सामान्य प्रशासन विभागाचे अधिनस्त संवर्गापैकी कनिष्ठ सहाय्यक (लि.व.), वित्त विभागाचे अधिनस्त कनिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गातील पदोन्नतीने भरण्यासाठीची रिक्त पदे तसेच आरोग्य विभागाकडील आरोग्य सेवक (पु) या संवर्गासाठीचे पदोन्नतीने भरण्यासाठीची रिक्त पदे अशी विविध संवर्गातील पदोन्नतीने भरण्यासाठीची रिक्त पदे ही एस.एस.सी.उत्तीर्ण जिल्हा सेवा (वर्ग-4) परिचर संवर्गातील कर्मचा-यांमधून भरण्यात येणार असल्याने त्याबाबत सेवाप्रवेश नियमातील शैक्षणिक व इतर पात्रतेप्रमाणे सेवाजेष्ठतेनुसार पात्र कर्मचा-यांचे मुळ सेवापुस्तिका, मुळ शैक्षणिक व इतर कागदपत्राची मागणी करण्यात येवून मुळ शैक्षणिक व इतर कागदपत्रांचे तपासणीअंती तात्पुरती पात्र /अपात्र यादी प्रसिध्द करुन प्राप्त आक्षेप/हरकती विचारात घेवून जिल्हा सेवा वर्ग-4 परिचर संवर्गातील एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उतीर्ण व आरोग्य सेवक (पु) तसेच कनिष्ठ सहाय्यक (लिपीक/लेखा) या पदासाठीच्या पदोन्नतीसाठी अंतिम पात्र, अपात्र असलेल्या कर्मचारी यांची यादी दि. 04/07/2026 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

जिल्हा सेवा वर्ग-4 परिचर संवर्गातील एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उतीर्ण व आरोग्य सेवक (पु) तसेच कनिष्ठ सहाय्यक (लिपीक/लेखा) या विविध पदासाठीच्या पदोन्नतीसाठी अंतिम पात्र ठरलेल्या कर्मचा-यांसाठी त्यांचे शैक्षणिक पात्रतेप्रमाणे पदनिहाय विकल्प घेणे, तसेच पदस्थापना देणेसाठी दि.17/07/2026 रोजी सकाळी 11.30 वाजता जिल्हा परिषद स्थायी समिती सभागृह जिल्हा परिषद धाराशिव येथे समुपदेशन आयोजित करण्यात आलेले आहे.

करीता दि. 04/07/2026 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जिल्हा सेवा वर्ग-4 परिचर संवर्गातील एस.एस.सी. किंवा तत्सम परीक्षा उतीर्ण व आरोग्य सेवक (पु) तसेच कनिष्ठ सहाय्यक (लिपीक/लेखा) या विविध पदासाठीच्या पदोन्नतीसाठी अंतिम पात्र ठरलेल्या कर्मचा-यांचे पदनिहाय विकल्प घेणे, तसेच पदस्थापनेबाबतच्या समुपदेशनास उपस्थित राहणेबाबत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद धाराशिव यांचे वतीने आवाहन करण्यात येत आहे.

**( तुकाराम भालके )**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद धाराशिव.